**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे श्री. एस.एस. चांडक वकील यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

५. (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १५/१ कडील कागद दाखविला) आता मला दाखविलेला कागद हा आरोपीने मला दिलेला धनादेश आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती मी ओळखतो. (सदर धनादेशास **निशाणी १९** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १५/२ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेले कागद हा धनादेश परतीचा मेमो आहे. त्यावर संबंधीत बॅकेचा शिक्का आहे व शाखा प्रबंधकाची सही आहे. (सदर धनादेश परतीचे मेमोला **निशाणी २०** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी ३/३ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेला कागद हा मी आरोपीला दिलेल्या नोटीसची स्थळ प्रत आहे. त्यावर माझ्या वकीलांची व माझी सही आहे. सदर नोटीसमधील मजकुर बरोबर आहे. (नोटीसच्या स्थळ प्रतिस **निशाणी २१** देण्यात येते.) (फिर्यादीचे वकीलांनी साक्षदारास निशाणी १५/३ कडील कागद दाखविला.) आता मला दाखविलेलो कागद हे आरोपीला पाठविलेल्या नोटीसचा परत आलेला लखोटा आहे. (सदर नोटीस न्यायालयासमोर उघडण्यात आली) सदर नोटीसवर माझी व माझ्या वकिलांची सही आहे. आरोपीला नोटीसची माहिती देउनही त्याने नोटीस न स्वीकारल्याने सदर पाकीट परत आलेले आहे. तसा त्यावर शेरा आहे. (सदर नोटीसच्या पाकीटास त्यातील मुळ नोटीससह **निशाणी २२** देण्यात येते.)

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एम.झेड.राठी यांच्यामार्फेत</u>**

निशाणी २३ वरील अर्जावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/-

दि. १५/०२/२०२४.
अकोट

भानुप्रताप ब. चौहान
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग